# पंचायत समिती

## १.सीआर/१६८/अमरावती/२०१५

यातिल तक्रारदार हे मजुरी करीत असुन ते चिखलदारा, मेळघाट येथील दुर्गम व आदीवासी भागातील रहीवासी आहेत. त्यांनी ॲन्टी करप्शन ब्युरोचा टोल फ्री क्रमांक १०६४ वर तक्रार केल्याने त्यांचेशी तपास अधिकारी यांनी संपर्क करून परतवाडा येथे जाउन त्यांची लेखी तक्रार नोंदविली आहे.

तक्रारदार यांनी लेखी तक्रार नोंदविली की, अंदाजे तीन महीण्याअगोदर पंचायत समिती चिखलदरा येथुन इंदीरा आवास योजने अंतर्गत त्यांचे वडील इंदल लक्ष्मण गाठे व आजोबा लक्ष्मण ब्रिजलाल गाठे यांचे नावावर घरकुल मंजुर झाले होते. त्या घरकुलाच्या बांधकामाच्या पहिल्या टप्प्याकरीता एक महीण्याअगोदर मिळालेल्या पैशाचे चेक पंचायत समिती चिखलदरा येथील इंजीनिअर श्री. जिरापुरे यांनी त्यांचे वडील व आजोबांचे बॅक अकाउंटमधे जमा केले होते. त्यानंतर ते पैसे वापरून त्याचें वडील व आजोबांनी मिळून घरकुलाच्या फाउंडेशन चे काम केले. त्यानंतर घरकुलाचे पुढील काम करण्याकरीता पैशाची आवश्यकता असल्याने ते चेकबाबत विचारपुस करण्याकरीता आलोसे जिरापुरे, यांचेकडे गेले असता आलोसे जिरापुरे यांनी तक्रारकर्ता यांना घरकुलाचे आधीच्या चेकबाबत व पुढचा चेक बॅकेत टाकण्याकरीता रु. २०००/— लाचेची मागणी करीत असल्याबाबत तक्रारदार यांनी ॲन्टीकरप्शन ब्युरो, अमरावती यांचेकडे तक्रार केली.

नमुद तक्रारीवरून सापळा कार्यवाही केली असता आलोसे चंद्रकांत भगवंतराव जिरापुरे, वय ४६ वर्ष, सहायक कनिष्ठ अभियंता, पंचायत समिती, चिखलदरा जि. अमरावती यांनी तक्रारदार यांचेकडुन रु.२०००/— लाचेची रक्कम तक्रारदार यांचे राहते घरी पंचासमक्ष स्विकारल्याने गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरबाबत आलोसे यांचेविरूध्द पोस्टे चिखलदरा, अमरावती (ग्रामिण) येथे अप.नं. ३००६/१५, कलम ७,१३(१)(ड) सह कलम १३(२)ला.लु.प्र.कायदा १९८८ प्रमाणे १८.०२.२०१५ चे १९:५५ वा. गुन्हा नोंद केला असुन आलोसे यांना अटक करण्यात आली आहे.